॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# आकाश कंदील

# DIWALI

## नोव्हेंबर २०२५
## दिवाळी अंक

॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# अनुक्रमणिका


- NEMM अध्यक्षीय
- कार्यकारिणी समिती, संपादक समिती
- NEMM Sponsors
- चित्रकला
- छायाचित्र
- कविता, कोडी
- लेख

# अध्यक्षीय मनोगत

## From the President's Desk

प्रिय NEMM परिवार,
दिवाळीच्या उत्सवानंतर हा दिवाळी अंक तुमच्यापर्यंत पोहोचवतांना, गेल्या दोन वर्षातील आपल्या एकत्रित प्रवासाची ऊब मनात पुन्हा जागी होते.
यंदाचा अंक माझ्या अध्यक्षीय कार्यकाळातील शेवटचा दिवाळी अंक असल्यामुळे हा क्षण विशेष भावपूर्ण आणि स्मरणीय आहे.
गेल्या दोन वर्षांचा प्रवास मागे वळून पाहताना एक सत्य वारंवार उमटतं—NEMM ही फक्त संस्था नाही, ती आहे सेतु मराठी मनांचा — आपल्या सर्वांना जोडणारा, जपणारा आणि पुढे नेणारा एक उबदार दुवा.

या काळात आपण अनेक उपक्रम, कार्यक्रम आणि सांस्कृतिक पर्व एकत्र साजरे केले; पण त्यामागे असलेली नाती, आपुलकी आणि समुदायभाव यांचाच खरा पाया "आपलं NEMM" घडवत राहिला.

माझी समिती—गेल्या दोन वर्षांत प्रत्येक सदस्याने मनापासून, एकदिलाने आणि अपार प्रेमाने योगदान दिलं. कार्यक्रम नियोजन, कलाकारांचा समन्वय, सजावट, फोटोबूथ, AV, सेट बांधणी, नोंदणी, आर्थिक व्यवहार, facility booking, vendor management आणि कार्यक्रमानंतरची साफसफाई —प्रत्येक कामात समितीची निष्ठा आणि एकजूट स्पष्ट जाणवत होती. एकत्र येऊन या सर्वांनी १०,०००+ तास या संस्थेसाठी दिले —तेही अपेक्षेविना, हसतमुखाने आणि समुदायावरील प्रेमातून.
या दोन वर्षांच्या कामात साथ देणाऱ्या सर्व स्वयंसेवक, कलाकार, प्रायोजकांचे आणि हितचिंतकांचे मनापासून धन्यवाद.

॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# अध्यक्षीय मनोगत

आणि ज्यांच्या सहभागाने NEMM चे प्रत्येक पाऊल अधिक अर्थपूर्ण बनले.
आणि सर्वांत महत्त्वाचे— आपले सदस्य....
तुमचा उत्साह, सहभाग, प्रेरणा आणि विश्वास यांच्यामुळेच आमच्या प्रत्येक उपक्रमाला संजीवनी मिळाली. तुमच्या या उबदार साथीसाठी मी सदैव ऋणी आहे.  समितीचा कार्यकाळ संपत असला तरी—हा निरोप नाही.
आपली नाती, आपली आपुलकी आणि आपला सांस्कृतिक दुवा पुढेही असाच टिकून राहील.

कारण आपलं NEMM हे खरंच आहे — “सेतु मराठी मनांचा.”

मराठी मनांच्या संगतीत,
जुळले नवे ऋणानुबंध,
सेवेच्या या पुण्य वाटेवर,
सापडले हसरे अन् सोनसळी छंद.

मराठी भाषेच्या या सुगंधातून
स्पर्शून गेली आपुलकीची चाहूल,
मराठी संस्कृती जपत असताना उमटलं—
मनाला उजळून टाकणारं आनंदाचं फूल.

कार्य, कार्यक्रम, आणि उत्सवांमध्ये
दरवेळी उमटलं एकच सत्य—
मराठी सेवेतलं सुख म्हणजे
मनाला उभारी देणारं प्रेरणास्त्रोत.

मराठी माणसांसाठी केलेला प्रत्येक प्रयत्न
झाला माझ्यासाठी आनंदाची खास भेट;
या सेवेतून मिळालेलं हे अनुभव
राहतील आयुष्यभर मनात जपून—
अविचल, अबाधित...

आपल्या सर्वांना दिवाळीनंतरच्या आनंदमयी आणि मंगल काळाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. नवीन पर्वात उजळणारा प्रकाश, समृद्धी आणि आनंद तुमच्या जीवनात भरभरून येवो.

मनःपूर्वक,
वैशाली गाडे,  अध्यक्ष, न्यू इंग्लंड मराठी मंडळ (२०२४–२५)

॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# न्यू इंग्लंड मराठी मंडळ (NEMM)
## २०२४-२०२५ कार्यकारिणी समिती

- वैशाली गाडे
- माया ताम्हणकर
- सचिन येवला
- पल्लवी दातार
- अंजली माईणकर
- राहुल गाडे
- राहुल वाचासुंदर
- अदिती मांजरेकर
- अक्षता सहस्रबुद्धे-कापडणे
- वृषाली फिरके
- मिलिंद रानडे
- निखिल बाविस्कर
- आश्रय भावसार
- अभि कानडे
- साहिल नलावडे
- चैतन्य भावे
- अमृता सामंत भडकमकर
- कौमुदी वाळिंबे
- प्रणय भडकमकर

## संपादक समिती
साहिल नलावडे, माया ताम्हणकर, वैशाली गाडे

# Meet out SPONSORS



# चित्र कला

# अवनी भिडे




# आकाश कंदील

# मिश्का भालेराव



॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# मिश्का भालेराव



# मिश्का भालेराव



॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# ज्योती जोशी



# ज्योती जोशी



# ज्योती जोशी



# छायाचित्र

॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# रत्ना दलाल



# आकाश कंदील

नोव्हेंबर २०२५, दिवाळी अंक

# कविता, कोडी

## माझ्या सासूबाई आणि त्यांचे दिवाळीचे पार्सल

- अर्चना पानवलकर

सासूबाई कश्या असाव्या
माझ्या सासुबाईंसारख्या असाव्या
कितीही वाजता फ्लाइट पोहचले तरी
त्यांनी भाकर तुकडा जरूर ओवाळावा
सुनेच्या आवडीचा इडली सांबर
न चुकता तयार ठेवावा
प्रत्येक ट्रिप ला कमीत कमी
एक साडी व एक दागिना जरूर द्यावा
मुलाच्या आवडीबरोबर
सुनेच्या आवडीचे पदार्थ पण बनवावे
सुनेचा चेहरा थोडा जरी उतरला तरी
सगळं ठीक ना पटकन विचारावे
मुलगा सूनेला बाहेर जेवायला घेवून जावे
नवीन काही दिसले की सुनेकरता घेवून ठेवावे
केसांना तेल लावून मसाज करुन द्यावा
निघताना बरोबर भरपूर खावू द्यावा
नको नको म्हटले तरी एयरपोर्ट वर
घ्यायला व सोडायला जरूर यावे
काळजी घ्या, नीट रहा असे
सांगायला कधी न विसरावे
विशेष दिवसांना आवर्जून
पार्सल पाठवावे

आणि दिवाळीचे पार्सल
तर फारच विषेश असावे
चकली, चिवडा, शंकरपाळे,
लाडू, चिवडा, अनारसे,
करंज्या, काजू कतली, आंबावडी
नक्षीदार पणत्या व स्टिकर रांगोळी
चंदनाचा साबण व आकाश कंदील
कसलीच त्यात कमतरता नसावी
जणू पार्सल मधून सण अवतरावा
फराळातून आशीर्वाद मिळावा
असे पार्सल सगळ्यांना यावे
व अश्या सासूबाई
सगळ्यांच्या असाव्या

शुभ दीपावली!

# ‘अमेरिका’ : शब्दकोडे

( रचना :- गुरुप्रसाद दि. पणदूरकर )

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ४ | | ■ | ५ |
| | ■ | ६ | | | ■ | | ■ | ७ | |
| ■ | ८ | | ■ | ९ | १० | | ११ | | ■ |
| १२ | | ■ | १३ | ■ | | ■ | | ■ | १४ |
| ■ | १५ | १६ | ■ | १७ | | १८ | ■ | १९ | |
| २० | ■ | २१ | २२ | | ■ | २३ | | ■ | |
| २४ | २५ | ■ | | ■ | २६ | | ■ | २७ | |
| २८ | | | ■ | २९ | | ■ | ३० | ■ | |
| ■ | | ■ | ३१ | | ■ | ३२ | ■ | ३३ | ■ |
| ३४ | | | | ■ | ३५ | ■ | ३६ | | |

***( शब्दकोड्यातील सारी उत्तरे व सुगावे हे 'अमेरिके'शी संबंधित आहेत )***

| **आडवे शब्द :-** | **उभे शब्द :-** |
|---|---|
| १] 'नॅशव्हिल' ही राजधानी असणारे आग्नेयेकडील राज्य | १] 'विद्युत उर्जे'वर चालणाऱ्या गाड्या बनवणारी इलॉन मस्कची प्रसिद्ध कंपनी |
| ३] 'डेट्रॉईट' शहर 'या' राज्यात आहे | २] अमेरिकेचे वरिष्ठ सभागृह |
| ६] 'लास वेगास' शहर 'या' राज्यात आहे | ३] १९९७ सालचा चित्रपट - द 'XXX' टच |
| ७] हॉलीवुडचा देखणा अभिनेता - 'XX' क्रूझ | ४] २००७ पासून हॉलीवूडमध्ये कार्यरत असणारा अभिनेता - 'XXX' राईट |
| ८] हॉलीवूडचा अभिनेता, दिग्दर्शक - 'XX' ईस्टवूड | ५] 'स्लॅपस्टिक' अभिनयासाठी ओळखला जाणारा अभिनेता - 'XX' कॅरी |
| ९] २०२४ मध्ये निधन पावलेला हॉलीवूडचा ज्येष्ठ कॅनेडियन अभिनेता - डोनाल्ड 'XXXXX' | ७] 'अराऊंड द वर्ल्ड इन ८० डेज' या गाजलेल्या चित्रपटाचा निर्माता - मायकल 'XX' |
| १२] गाजलेल्या 'टायटॅनिक' चित्रपटातील नायिका - 'XX' विन्सलेट | ८] १९९३ ते २००१ या काळातील राष्ट्राध्यक्ष - बिल 'XXX' |
| १३] २०२१-२०२५ या काळातील राष्ट्राध्यक्ष (प्रथमनाव) | १०] चार्ली चॅप्लिनचा गाजलेला चित्रपट - 'X XX' डिक्टेटर |
| १५] अमेरिकेतील 'स्टेट आर्टस् ॲक्शन नेटवर्क' (SAAN) या संस्थेचे मराठी लघुरूप ***(उलटे लिहा)*** | ११] १९९१ सालचा 'ऑस्कर' विजेता चित्रपट - द सायलंस ऑफ द 'XX' |

| | |
|---|---|
| १७] एकोणिसाव्या शतकातील उद्योगपती, संशोधक व राजकारणी - 'XXX' कूपर | १३] २०२१-२०२५ या काळातील राष्ट्राध्यक्ष (प्रथमनाव) |
| १९] एक महान गोल्फर - 'XX' निकल्स | १४] १९१५ साली जन्मलेला महान इटालियन-अमेरिकन गायक, अभिनेता - "XX, XXX" |
| २१] विमानाचा शोध लावणारे 'बंधू' | १६] 'गोल्डन ग्लोब अवॉर्ड' विजेती अभिनेत्री - 'XX' पॉल्सन |
| २३] गाजलेली टीव्ही मालिका - 'XX' अँड द सिटी | १७] महान टेनिसपटू - 'XX' सँप्रास |
| २४] फेसबुक, इंस्टाग्राम इत्यादी समाजमाध्यमांची मालकी असणारी कंपनी - 'XX' प्लॅटफॉर्म्स | १८] 'ग्लॅडिएटर' चित्रपटासाठी ऑस्कर पुरस्कार जिंकणारा हॉलीवूड अभिनेता - 'XXX' क्रो |
| २६] २०२४ सालचा चित्रपट - जिंगल 'XX' लव्ह | २०] 'बे-वॉच' मालिकेमुळे प्रसिद्धीस आलेली अभिनेत्री, मॉडेल - 'XXX' ॲन्डरसन |
| २७] १९३९ साली जन्मलेली लोकप्रिय 'रॉक & रोल' गायिका, गीतकार - 'XX' टर्नर | २२] एका विमान वाहतूक सेवा देणाऱ्या कंपनीचे नाव - 'XX' कोस्ट फ्लाइट सर्विसेस |
| २८] १९९४ व २०१९ मध्ये प्रदर्शित झालेला लोकप्रिय हॉलीवूड चित्रपट - "द 'XXX' किंग" | २५] १९८६ साली 'हेवीवेट' वजनगटात विश्वविजेता ठरलेला वादग्रस्त मुष्टियोद्धा - माईक 'XXXX' |
| २९] प्रसिद्ध लेखक, वकील - 'XX' ग्रीशॅम | २६] ऑस्कर पुरस्कार विजेता अभिनेता - 'XX' ॲफ्लेक |
| ३०] अमेरिकेच्या उत्तर-पूर्व भागातील सहा राज्यांचा भूप्रदेश - 'X' इंग्लंड | २९] हॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता, निर्माता, संगीतकार - 'XX' डेप |
| ३१] १९४१ साली जन्मलेला प्रसिद्ध विनोदवीर, अभिनेता व लेखक - पॉल 'XX' | ३०] अमेरिकेच्या उत्तर-पूर्व भागातील सहा राज्यांचा भूप्रदेश - 'X' इंग्लंड |
| ३२] महान मुष्टियोद्धा 'महम्मद अली' याचे मूळ नाव - कॅशियस 'X' | ३१] 'फॅरेनहाइट' सारखे अनेक चित्रपट देणारा दिग्दर्शक, निर्माता, लेखक - मायकल 'XX' |
| ३४] कोलोरॅडो राज्याच्या राजधानीचे शहर | ३२] महान मुष्टियोद्धा 'महम्मद अली' याचे मूळ नाव - कॅशियस 'X' |
| ३५] प्रसिद्ध चीनी-अमेरिकन मार्शल आर्ट खेळाडू व चित्रपटकर्मी - ब्रूस 'X' | ३३] ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक मिळवणारा पहिला 'नेटिव्ह अमेरिकन' ॲथलिट - जीम 'XX' |
| ३६] जगप्रसिद्ध प्रकाशन संस्था - 'XXX' कॉलीन्स | ३५] प्रसिद्ध चीनी-अमेरिकन मार्शल आर्ट खेळाडू व चित्रपटकर्मी - ब्रूस 'X' |

# लेख

# अल्झायमर

-चिंतामणी प्रभाकर मुळे (डोंबिवली)

चार वर्षांपूर्वी बँकेतून निवृत्त झाल्यापासून आम्ही मित्र मित्र वेगवेगळ्या वृध्दाश्रमांना भेट देणे, काही आर्थिक वा सामाजिक मदत करता आली तर करणे अशी समाजउपयोगी कामे करत असतो. असाच एकदा एका मित्राबरोबर तळेगावला एका वृध्दाश्रमात गेलो होतो. एक दाम्पत्य, समाजभावनेने, एका बंगल्यात आठ ते दहा आजारी वृध्दांचा सांभाळ अत्यंत अल्प दरात करत होते. आम्ही तेथे पोहचलो तेव्हा एक आजोबा वृध्दाश्रमाच्या अगदी फाटकापाशी उभे होते. कोणाची तरी वाट बघत उभे असावेत. त्यांनी आमची विचारपूस केली. आम्ही मुंबईहून आलो आहोत हे समजल्यावर त्यांचे डोळे चमकले आणि त्यांनी पुन्हा विचारले “कुठून मुंबईहून आलात का? तुमच्याकडे एक काम होतं बघा, कराल का? “

ते काही बोलणार तेव्हढ्यात त्या आश्रमाच्या संचालकांनी आम्हाला बघितले, ते पुढे आले आणि त्यांनी आजोबांना नीट समजावून त्यांच्या खोलीत नेले. आमचे चहापाणी चालू असताना ते आजोबा समोरच्या खोलीतून एकटक आमच्याकडे बघत होते. आम्ही निघालो तसे ते परत खोलीबाहेर आले आणि खिशातून पाचशे रुपये काढत म्हणाले “तुम्ही मुंबईहून आलात ना, हे पाचशे रुपये तेव्हढे, ए डी कुलकर्णीला द्या, नोकरीत असतांना, एकदा पाकीट घरी विसरलो तेव्हा त्याच्याकडून उसने घेतले होते, ऐन पावसाळ्यात टॅक्सिला पैसे नव्हते म्हणून घ्यावे लागले, तो दादरला राहतो, त्याला सांगा, मायभाटेंनी दिलेत म्हणून, ओळखेल तो” आम्हाला काही कळेना. कोण ए डी कुलकर्णी, कोण मायभाटे? आणि नक्की पत्ता काय? कसले पैसे? काहीच काळेंना. आम्ही त्यांना विचारत होतो तेव्हा संचालकांनी आम्हाला हळूच खूण केली आणि ते पैसे घ्या म्हणून खुणावले.

मग संचालक सांगू लागले “आहो हे मायभाटें आजोबा, त्यांना अल्झायमर झालाय, स्मरणशक्ती नष्ट झालीय, पण कधी काळी कोणा ए डी कुलकर्णी, नावाच्या, त्यांच्या मित्राकडून घेतलेले उसने पैसे द्यायचे राहिले असतील ते त्यांना बरोबर आठवते, मग ते मुंबईकडचं कोणी येतंय का त्याची वाट बघत असतात. आवारातच, अनवाणी भटकत राहतात, कितीही सांगितलं तरी चप्पल घालत नाहीत. घ्या ते पैसे, नंतर मी परत त्यांच्या खिशात ठेवेन.”

निघतांना मग मी मुद्दामून त्या आजोबांना भेटायला गेलो. मी दादरलाच राहतो, ए डी कुलकर्णींना ओळखतो आणि तुमचे पैसे नक्की त्यांना देईन असे सांगत आजोबांकडून पैसे घेतले आणि हळूच संचालकांना परत केले. आजोबा खुश झाले. त्यांच्या चेहऱ्यावर बरेच वर्षाचे कर्जाचे ओझे उतरल्याचा आनंद दिसत होता. ते आत जाऊन स्वतःहून चप्पल घालून आले आणि म्हणाले “मागे एकदा शन्ना नवरेच्या एका कथेत वाचले होते, एक माणूस उसने घेतलेले पैसे परत फेडेस्तोवर अनवाणी हिंडायचा, त्याच्या पायाला खडे बोचले की प्रत्येक खड्यागणित त्याला घेतलेल्या कर्जाची आठवण येत असे, आपण कोणाचे तरी देणे लागतो त्याची जाणीव होत असे. आज तुम्ही भेटलात, खूप हलकं हलकं वाटतंय, ए डी ला पैसे द्यायला उशीर झाला म्हणून सॉरी सांगा, इतके दिवस मुंबईच कोणी भेटतच नव्हतं, काय करणार? तुम्ही अगदी देवासारखे भेटलात. खूप बरं वाटतंय.

मुंबईकडे परततांना मी विचार करत होतो, किती निरागस होते ते आजोबा, किती प्रामाणिक, कोणाकडून कधी काळी घेतलेले अवघे पाचशे रुपये परत करायला जमले नव्हते म्ह्णून किती हळवे झाले होते. मग मला देश सोडून पळून जाणारे गडगंज कर्ज बुडवे आठवले. बँकांना कर्ज वसुली करत कर्जदारांच्या कसे हातापाया पडावे लागते ते आठवले, ऐपत असून केवळ दुसऱ्याचे पैसे बुडवायचे म्हणून स्वतःला दिवाळखोर घोषित करणारे व्यावसायिक आठवले, कोट्यवधी रुपयांचा अपहार करून ताठ मानेने हिंडणारे भ्रष्टाचारी आठवले आणि वाटले कर्जबुडवेगिरी हा रोग तर अल्झायमर पेक्षा भयंकर असावा.

# आमच्या च्याची

- वीणा पेंडसे

आमच्या च्याची म्हणजे आमच्या आयुष्यातलं एक अतिशय प्रेमळ, सोज्वळ, शांत, निरपेक्ष व्यक्तिमत्व. ओलावा निर्माण करणारं, निरपेक्ष प्रेम देणारं नातं. आमच्या लहानपणी आम्ही च्याचींकडे सांभाळायला जायचो. म्हणजे सांभाळून घ्यायला जायचो. मी चार महिन्यांची असताना आमचे आईबाबा मला सांभाळण्यासाठी म्हणून एखाद्या प्रेमळ बाईंच्या शोधात होते. त्याच सुमारास च्याचींचे यजमान गेल्यामुळे उदरनिर्वाह भागवण्यासाठी म्हणून त्या मुले सांभाळण्याच्या विचारात होत्या. टिळक चौकातल्या पटवर्धनांच्या वाड्यात दुसऱ्या मजल्यावर त्यांचं बिऱ्हाड होतं. तळमजल्यावर आमच्या आजीची धाकटी बहीण, म्हणजे आमची चंपू आजी राहायची. तिच्याकडून माहिती मिळाली, आणि सहा महिन्यांची वीणा च्याचींकडे सांभाळायला जायला लागली.

माझ्या आठवणी ज्या आहेत, त्या अर्थातच मी थोडी मोठी झाल्यावरच्या आहेत. आजकालचं पाळणाघर म्हणा, किंवा daycare म्हणा, यांच्यासारखं काहीच नव्हतं ते. मी आणि लीना (माझी धाकटी बहीण), आम्ही दोघीच सांभाळायला त्यांच्याकडे. मला ताई आणि लीन ला माई म्हणत त्या. घरात च्याची आणि त्यांची मुलगी चित्रा, म्हणजे आमची चित्राताई. आधी त्यांना च्याची हे नाव कसं पडलं हे सांगायला हवं. चित्राची आई म्हणून त्यांना सगळे जण चित्राची आई म्हणायचे. मला चित्रा म्हणता यायचं नाही. म्हणून मी त्यांना चिया ची आई... च्याची म्हणायला लागले. पुढे आमच्याकडे हेच नाव प्रचलित झालं.

आमच्या च्याची म्हणजे अतिशय प्रेमळ, शांत स्वभावाच्या. अगदी साध्या. सुती नऊवारी पातळ, दोन्ही खांद्यावरून पदर, केसांचा अंबाडा. हातात एक एक सोन्याची बांगडी.

गळ्यात दोन पदरी चपलाहार. हीच काय ती पूर्वीच्या सुखवस्तू पणाची खूण. यजमानांच्या अकाली निधनामुळे त्यांच्यावर फारच वाईट प्रसंग आला. चित्राताई शाळेत जाणारी, एवढी लहान होती. त्यांचं शिक्षण फारसं नसावं. त्यामुळे मुलं सांभाळण्याची वेळ त्यांच्यावर आली. पण स्वाभिमानी होत्या. कधी कोणाकडे हात पसरायचे नाहीत असं ठरवलं असावं. नाहीतर त्यांच्या माहेरी कोकणात, जंजिरा मुरूडला जाऊन राहता आलं असतं. पण ते त्यांनी केलं नाही. स्वकष्टानी जमतील तेवढे पैसे कमवून मुलीचं शिक्षण चालू ठेवलं. संसार करत राहिल्या.

आजकालच्या पाळणाघरात भरपूर मुलं असतात. ती त्यांच्या घरून आणलेला डबा खातात. एकमेकांशी खेळून वेळ घालवतात. झोपायला सांगितलं की झोपतात. उठवलं की उठतात. आई कधी येत्ये न्यायला याची वाट बघत बसतात. सर्दी खोकला ताप असेल तर त्यांना पाळणाघरात जाता येत नाही. च्याचींकडे हे असं काहीच नव्हतं. लीनला खूपदा ताप यायचा. त्यावेळी आई ऑफिसला जाऊ शकायची कारण च्याची तिची पोटच्या मुलीप्रमाणे काळजी घ्यायच्या. कधी कधी ताप एव्हडा जास्त असायचा की रात्री सुद्धा खूप लक्ष ठेवायला लागायचं, शिवाय लीन, आई आणि च्याचींशिवाय फारशी कोणाजवळ राहत नसे. अश्या वेळी च्याची रात्री सुद्धा आमच्याकडे राहायला आलेल्या आहेत. कोण करतं एवढं आपल्याकडे सांभाळायला येणाऱ्या मुलींसाठी?

फक्त आमच्या च्याचीच करू शकतात. त्यांच्याकडे आधी फक्त मी आणि नंतर मी आणि लीन अश्या आम्ही दोघीच सांभाळायला होतो. आमच्या बरोबर अजून दोन मुलांना सांभाळणं त्यांना साहस शक्य होतं. पण तसं त्यांनी केलं नाही. हे मुलं सांभाळायचं काम त्या केवळ पैश्यासाठी करतच नव्हत्या. सर्वप्रथम जे काम करायचं ते अगदी

मनापासून करायचं हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. त्याच्या जोडीला त्या मनानी अतिशय चांगल्या होत्या. आम्हाला त्यांच्या कुटुंबातल्या मुली म्हणूनच त्यांनी नेहमी वागवलं. आमच्यावर भरपूर प्रेम केलं. आमच्या यशामध्ये आमच्या आईला जसा आनंद झाला आणि आभिमान वाटला, तसाच आनंद आणि आभिमान च्याचींना पण वाटला. आमच्या result च्या दिवशी आमचं प्रगतीपुस्तक त्याच सगळ्यात आधी बघायच्या. आम्हाला छान मार्क्स मिळायचे आणि पहिला दुसरा नंबर यायचा याचं त्यांना खूप कौतुक असायचं. Result लागल्यावर ताई आणि माई ला काय काय बक्षिसं मिळाली ते सगळ्यांना फार मोठ्या अभिमानानी सांगायच्या. Result च्या दिवशी दुपारी त्या आम्हाला बर्फाचा गोळा बक्षीस म्हणून द्यायच्या. ते बक्षीस आमच्यासाठी खूप मौल्यवान होतं. इतकं की त्या दहा पैश्याच्या बक्षिसाची किंमत कधीच करता येणार नाही.

त्यांच्या बहिणी म्हणजे शांता आणि शालू या चित्रा ताईच्या जशा मावश्या होत्या तशाच आमच्या पण होत्या. तसेच मोरू मामा आणि अनंता मामा देखील आमचे मामा होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत कधी काही कारणांनी आम्ही च्याचींबरोबर शांता मावशीकडे ठाण्याला तर शालू मावशीकडे अंबरनाथला जात असू. मला अमुक तमुक कारणानी माझ्या बहिणीकडे जायचं आहे म्हणून आज मुलींना पाठवू नका असं नसायचं. दरवर्षी उन्हाळ्यात मात्र एक आठवडाभर त्या त्यांच्या माहेरी मुरुडला जायच्या. तीच काय ती त्यांची वर्षाची सुट्टी. मुरूडहून येताना परत आमच्यासाठी आंबे, फणस आणि इतर कोकणचा मेवा घेऊन यायच्या. मग नंतरचे तीन चार आठवडे आमची चंगळ असायची. आमच्या आईचं ऑफिस साडेदहाला असायचं. ऑफिस च्या घाईत आम्हाला आधी च्याचींकडे सोडायला जावं लागायचं नाही तिला. कारण च्याची स्वतः येऊन आम्हाला त्यांच्याकडे घेऊन जायच्या.

सुरवाती सुरवातीला आई आमच्या जेवणाचा डबा द्यायची. पण डब्यातलं गार झालेलं अन्न आम्हाला न देता, त्यांनी केलेलं गरम गरम जेवण आम्हाला द्यायच्या. हे कळल्यावर मग तांदूळ डाळ असा शिधा द्यायला सुरवात केली. आमच्या मुलींना चांगलं अन्न देतील की नाही वगैरे प्रश्न पडायची शंकाच नव्हती. तसा विश्वासच त्यांनी संपादन केला होता. त्यांच्या हातचं पिठलं म्हणजे आमचा स्वर्ग होता. पिठलं तोंड मिटलं ही म्हण त्यांच्या पिठल्यानी अगदी खरी व्हायची. मसूर डाळ वापरून एक प्रकारची डाळ करायच्या. तशी डाळ दुसऱ्या कोणालाच करता येत नाही असं आम्हाला तेव्हाही वाटायचं आणि आजूनही वाटतं. त्यांच्या हातात जादू होती.

दरवर्षी एक रात्र आम्ही त्यांच्याकडे राहायला जायचो. ती रात्र म्हणजे गणपती विसर्जनाची रात्र. कल्याणमध्ये गणपती उत्सव खूप मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. लोकमान्य टिळकांनी स्वतः कल्याणला येऊन सुरु करून दिलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचा कल्याणकरांना सार्थ आभिमान आहे. या सार्वजनिक गणपतींचं विसर्जन अनंत चतुर्दशीला न करता एकादशीला केलं जातं कल्याणमध्ये. विसर्जनाची मिरवणुक च्याचींच्या घरावरून जायची. ती बघण्यासाठी त्या रात्री आमचा मुक्काम त्यांच्या घरी असायचा. गणपती येण्याची जशी दरवर्षी आम्ही वाट बघायचो, तशीच जाण्याच्या दिवशीची पण बघायचो, केवळ च्याचींकडे रात्री पण राहायला मिळणार म्हणून!

गॅलरी मधून रस्त्यावरची माणसं, टांगे, पुढे कल्याणात रिक्षा आल्यावर त्या रिक्षा बघण्यात भरपूर वेळ मजेत जायचा. पूर्वी कल्याणमध्ये टांग्यांना नंबर मिळायचे. दरवर्षी ते बदलायचे. जो घोडा सर्वात छान धावणारा आणि जो टांगा सगळ्यात छान सजवलेला त्याला पहिला नंबर मिळायचा.

लांबून टांगा येताना दिसला कि तो कुठल्या नंबरचा आहे ते ओळखण्याची आमची चढाओढ लागायची.

उन्हाळ्याच्या सुट्टीत दुपारी, त्यांच्या शेजारचे माधवी, मिलिंद, सतीश दादा, नीता ताई, आमचा चुलत मावस भाऊ - म्हणजे आमच्या चंपू आजी चा नातू अनिल जोशी, साधना ताई आणि विनय दादा कापरेकर, तसेच माधवी मिलिंदची आई शुभांगी काकू, तशेच नीता सतीश ची आई, आमची चित्रा ताई, अश्या सगळ्यांचा मिळून कॅनिसट्याचा डाव प्रचंड रंगायचा. संध्याकाळी डबा ऐसपैस चा खेळ रंगायचा. तो कधी संपूच नये असं वाटायचं. असा खेळ रंगात आलेला असताना आईला यायला थोडा उशीर झाला तर बरं होईल असंही वाटायचं.
कधी तरी आई ऑफिस मधून येताना वझ्यांचा बटाटे वडा घेऊन यायची. अर्थातच च्याची आणि चित्रताईसाठी सुद्धा वडा आणलेला असायचा. सगळे मिळून वडे खाऊन मग आम्ही आईबरोबर घरी जायचो. आमचे बाबा मुंबईला ऑफिसला जायचे त्यामुळे वडा खायला ते नसायचे. तसंच आमच्या आजीचा वडे खाण्याशी काहीच संबध नव्हता. कधी कधी आई महाराष्ट्र कोल्ड्रिंक्स मधून quality ice cream चे कप सगळ्यांसाठी घेऊन यायची. ते ice cream छोट्या छोट्या लाकडी चमच्यानी खाण्याची मजा काही औरच होती!!!
पुढे मी आठवीत गेल्यावर माझी शाळा दुपारी १२.३५ ला भरायची. सकाळी क्लास असायचा. त्यामुळे च्याचींकडे जायला वेळच मिळायचा नाही. लीन मात्र जात होती. मधल्या काळात चित्राताई ला नोकरी लागली. पुढे तिचं लग्न झालं. च्याचींची मोठी जबाबदारी संपली. मी शाळेत असताना चित्राताई ला पहिली मुलगी झाली - समृद्धी. पुढे चित्राताई ठाकुर्लीला राहू लागली. नोकरी VT ला. समृद्धीला सांभाळण्यासाठी च्याची चित्राताई कडे राहायला गेल्या. त्यांचं कल्याण सुटलं. त्यानंतर लगेचच मी अकरावीत असताना आणि लीन आठवीत असताना आम्ही सुद्धा कल्याण सोडून पुण्याला राहायला गेलो. रोजचं जाणं येणं संपून गेलं तरी ओढ मात्र कायम होती. आम्हालाही आणि च्याचींनाही. पुण्याला गेल्यावर दर उन्हाळ्याच्या सुट्टीत दोन दिवस तरी आम्ही कल्याणला जात असू. तेव्हा आवर्जून च्याचींना भेटायला जायचो.

पुढे अशा गाठी भेटीही हळूहळू बंद झाल्या. काही कारणानी च्याची माझ्या लग्नाला येऊ शकल्या नव्हत्या. लीन च्या लग्नाला मात्र त्या आल्या होत्या. माझी आणि त्यांची तीच शेवटची भेट (सप्टेंबर १९९६). त्याच वेळी त्यांची तब्बेत थोडी खालावली होती. पुढे बरीच वर्ष च्याची चित्राताई कडे राहून, आपल्या दोन नातींना सांभाळत होत्या. अगदी त्या दोघी कॉलेज ला जाई पर्यंत. अधून मधून आमची आई फोनवर त्यांच्याशी बोलत असे. तिच्याकडून त्यांची खुशाली समजत असे. आयुष्यभर खूप दुःख सहन करून आणि खूप कष्ट करून झाल्यावर, त्यांचं म्हातारपण मात्र सुखात आणि आनंदात गेलं, याचं खूप समाधान आहे. जावई त्यांना गाडीनी सगळीकडे घेऊन जात. अगदी स्वतःच्या आई सारखी त्यांची काळजी घेत. मुलगी जावयानी शेवटपर्यंत त्यांना छान सांभाळलं. या बाबतीत मात्र त्या lucky होत्या. शिवाय त्यांच्या स्वभावामुळे नातेवाईकांना धरून होत्या. रक्ताचं काहीही नातं नसलेल्या त्यांच्या ताई माईच्या हृदयात अजूनही त्यांच्यासाठी खूप आदर, प्रेम आणि ममता आहे. च्यांचींची आठवण खूपदा येते. अद्वैत लहान असताना जेव्हा त्याला daycare मध्ये ठेवायची वेळ आली तेव्हा च्याचींनी आमच्यासाठी काय आणि किती केलं आहे याची फार तीव्रतेनी पहिल्यांदाच जाणीव झाली. आणि त्यांच्या बद्दल वाटणारा आदर द्विगुणित झाला. स्वतःच्या मुलाला दुसऱ्यांच्या जीवावर सोडताना मनाला जे काही दुःख होतं, काळजीनी आतड्याला काय पीळ पडतो याची प्रचिती आली. तसंच ज्या व्यक्तीवर आपण ती जबाबदारी टाकतोय ती व्यक्ती किती आपुलकनी आणि प्रेमानी आपल्या मुलाला सांभाळते ही एकमेव गोष्ट त्यावेळी जगातली सगळ्यात महत्वाची गोष्ट असते हे ही त्याचवेळी जाणवलं. च्याची

आम्हाला सगळ्यांना मिळाल्या हे मी आमचं परम भाग्य समजते. त्यांनी आमच्यासाठी जे केलं त्याला नक्की काय म्हणायचं हेच मला समजत नाहीये. त्यांनी आमच्यावर उपकार केले असं म्हणून मी त्यांच्या प्रेमाचा अनादर करणार नाही. शिवाय त्यांचं आमच्यावर ऋण आहे असं समजलं तर त्याची परतफेड

करण्याची माझी कुवतही नाही आणि परतफेडीची भाषा करून त्यांच्या आमच्या नात्याचा अपमान करायची इच्छाही नाही. त्यांच्या रुपानी आम्हाला दुसरी आईच मिळाली जणू, अजून काय म्हणू?
च्याचींकडून, त्यांच्या वागण्यातून आम्ही खूप काही शिकलो. अगदी आमच्या नकळत. एखाद्यावर निरपेक्ष प्रेम करणे, साधी रहाणी, घर स्वच्छ आणि नीटनेटकं ठेवण्याचं महत्व, जे काम करायचं ते मन लावून करायचं म्हणजे ते चांगलच होतं. (साध्या मसूर डाळीचं वरणही डाल माखनीच्या तोंडात मारेल असं होऊ शकतं), माणसांना धरुन राहण्याचं महत्व, पैसा नसेल तरी स्वाभिमानानी आणि सुखात राहता येतं - या आणि अशा अनेक.

Retirement नंतरच्या आयुष्यात, स्वतःच्या नातवंडा बरोबर एखाद्या मुलाला शाळा सुटल्यानंतर आमच्या घरी ठेऊन घ्यायला नक्कीच आवडेल. एखाद्या छोट्या जीवाला प्रेमळ आणि safe space उपलब्ध करून देता आली, आपल्या संस्कृतीची ओळख करून देता आली तर ते मी आमचं भाग्यच समजीन. च्याचींसारखं निरपेक्ष प्रेम देणं ही अजिबात सोपी गोष्ट नाहीये. पण तसा प्रयत्न तरी नक्कीच करणार आहे. च्याचींचा आशिर्वाद नक्कीच माझ्या पाठीशी असेल.

# हाऊस अँड होम - अ कन्सेप्ट

लेखक : चिंतामणी प्रभाकर मुळे (डोंबिवली)

अमेरिकेतील बोस्टन जवळचे अंडोवर शहर. माझ्या मुलाने आणि सुनेने काही वर्षांपूर्वी इथे एक घर विकत घेतले.
डील झाले “सायलेंट सेल”च्या माध्यमातून. ना विकणारा, ना खरेदीदार — कोणीच समोरासमोर आले नाहीत. दोघांच्या एजंट्स नी सगळे ठरवलं, कागदपत्रांची देवाणघेवाण ईमेलद्वारे झाली आणि बँकेने कर्ज मंजूर करताच काही दिवसात घर हस्तांतरित झालं. राहणारा मूळ मालक कुटुंबासहित घर खाली करून निघून गेला आणि मग हे दोघे तेथे राहायला आले.
मी सहज मुलाला विचारलं —
“हा घर विकणारा माणूस किती वर्षं राहिला असेल या घरात?”
तो म्हणाला —
“बाबा, तो जन्मल्यापासून येथेच राहिला, कारण हे त्याच्या वडिलांचं घर. त्याचं बालपण, तरुणपण, लग्न, मुलंबाळं सगळा संसार ह्याच घरात झालाय.”
माझं मन हळवं झालं. किती आठवणी दडलेल्या असतील या भिंतींमध्ये! त्या माणसाला किंवा त्याच्या बायकोला एकदाही वाटलं नसेल की आपले घर कोणी घेतलं हे बघावं, त्याला भेटावं त्याच्याशी ओळख करून घ्यावी आणि घराबद्दल काही विशेष त्याला सांगावं?

आपल्या देशात, बरीच वर्षे एखाद्या घरात राहिल्यावर, ते घर सोडून जातांना खूप वाईट वाटते. घर सोडून जायचे जीवावर येते. शेजारी पाजारी चहापाण्याला बोलावतात कारण या पुढे आपण रोज भेटणार नाही म्हणून सर्वांनाच वाईट वाटत असते - वर्षानुवर्षांचे ऋणानुबंध असतात. आनंदाच्या क्षणी एकमेकांत सामील झाल्याच्या आणि संकटाच्या काळी एकमेकांना केलेल्या मदतीच्या असंख्य आठवणी असतात.

॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

घर सोडतांना लोक चौकटीला डोके टेकवतात. उंबरठ्यावर नतमस्तक होतात. अंगणात लावलेल्या झाडांना मिठी मारतात, डोळ्यातून पाणी ढाळतात. घरातून पायच निघत नाही. पण इथे? साठ सत्तर वर्षे एखाद्या वास्तूत राहून ती सोडतांना घरातील सारं सामान 'गराज सेल' म्हणून पाटी लावून येईल त्या भावाला विकून टाकायचं आणि आपल्या घरात कोणी का येईना? आपल्याला हवी ती किंमत मिळाली की झालं! ही एकच संकल्पना घेऊन घर सोडायचं. हाऊस इज ओन्ली अ प्रॉपर्टी ह्या न्यायाने. मला मोठं नवल वाटलं.

त्या गोष्टीला आता चार एक वर्षे झाली असतील. एके दिवशी माझ्या मुलाला त्या मूळ घरमालकाच्या बायकोचा मेल आला "माझ्या नवऱ्याला काही विचित्र रोग झाला आहे तो कोणाशी काही बोलत नाही, तासंतास शून्यात बघत बसलेला असतो आणि लहानपणीच्या आठवणी काढत असतो. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे आपण जर त्याला जुन्या घरी नेले तर त्या घराच्या भिंती त्याच्याशी परत बोलतील, बालपणीच्या वातावरणात एखादे वेळेस त्याला सर्व आठवेल , एखादेवेळेस तो बोलू लागेल, त्याच्या धूसर झालेल्या आठवणींना उजाळा मिळेल तरी मी त्याला घेऊन तुमच्या घरी येऊ शकते का? आणि हो असेल तर कधी येऊ ते सांगा. अर्थात तुमची हरकत नसेल तर. तुमच्या घरच्यांची परवानगी असेल तर. मुलाने त्यांना दुसऱ्याच दिवशी संध्याकाळी या म्हणून कळवले.
आणि मग संध्याकाळी ठरल्या वेळी ते दोघे आले. आम्ही कोणीच त्या मूळ मालकाला कधी बघितले नव्हते.
पांढरे केस, थरथरते हात, निळ्या डोळ्यांत धूसर पाणी. वय असेल सत्तरीच्या आसपास. दार उघडल्यावर काही क्षण तो स्तब्ध उभा राहिला —
जणू इतक्या वर्षांनी घराने त्याला आणि त्याने घराला ओळखलं होतं.
हॉलमध्ये शिरून थरथरत्या आवाजात तो म्हणाला

"मी पहिल्यांदा चालायला लागलो तेव्हा इथेच माझी पहिली पावलं पडली होती...इथेच मी 'रो रो रो युवर बोट म्हणत बसायचो '
त्या कोपऱ्यात वडील मला झुलवायचे...
त्या भिंतीवर अजून खुणा आहेत का?
हो! पहा, अजूनही आहेत. ... माझ्या उंचीच्या खुणा, दर वर्षी वाढदिवसाला आम्ही बहीण भाऊ आमच्या उंचीच्या खुणा करून ठेवायचो." त्याच्या डोळ्यातून अश्रू टपकले.
नंतर त्याने किचन मध्ये जाऊन टेबलावर हात ठेवला.
"इथे आईने माझ्या वाढदिवसाला पहिला केक बनवला होता...
सुट्टीच्या दिवशी आम्ही सगळे बहीण भाऊ हसत-खेळत ह्याच टेबलाभोवती बसायचो."
वरच्या मजल्यावर पोहोचल्यावर तो एका खोलीसमोर बराच वेळ उभा राहिला.
"ही माझी खोली...
या खिडकीतून मी पहिला स्नो फॉल पाहिला होता. आकाशातून स्नो कसा काय पडू शकतो? तासंतास मी पांढरा शुभ्र स्नो बघत विचार करत बसायचो.
पहिलं प्रेमाचं पत्र मी इथेच वाचलं होतं."
त्याच्या डोळ्यांतून पुनः पुनः अश्रू गळत होते, पण चेहऱ्यावर एक विलक्षण शांतता होती.
आज बऱ्याच वर्षांनी, घराच्या भिंती, दारं, खिडक्या — सगळं त्याच्याशी पुन्हा बोलत होतं.
बालपणीच्या, तरुणपणीच्या त्याच्या हरवलेल्या स्मृती परत जाग्या होत होत्या.
घराच्या चौकटीला हात लावून तो बराच वेळ उभा होता.
डोळे मिटून, निःशब्द, एकदम शांत.
मग हलक्या आवाजात कुजबुजला —
"आता मी रिकामा नाही... माझ्या आठवणी मला पुन्हा मिळाल्या."

आम्ही सर्वांनी मग बसून कॉफि घेतली. तो माणूस बऱ्याच दिवसांनी मनातलं काही तरी बोलत होता त्या मुळे त्याची बायको खूपच खुश झाली होती. आनंदात होती. तो सर्व काही पुन्हा सापडल्याच्या आनंदात बॅकयार्ड मध्ये गेला तिथल्या त्यांनी कधी काळी लावलेल्या झाडांशी तो बोलत होता, झाडांना गोंजारत होता.
“अजून, संध्याकाळी इथे हरीण येते का?” त्याने मोठ्या आशेने विचारले.

निघताना त्याच्या बायकोने आमचे पुन्हा पुन्हा आभार मानले. आम्हाला झालेल्या तसदीबद्दल, वापरलेल्या वेळेबद्दल आणि परत घरात घेऊन घरभर फिरून दिल्याबद्दल काही मोबदला देऊ का? म्हणून विचारले. मुलाने नम्रपणे काहीही नको म्हणून सांगितले, उलट, गरज लागली तर, परत कधीही आलात तरी चालेल म्हणून सांगितले. ती दहा दहा वेळा आमचे आभार मानत होती. तो माणूस देखील भावविवश होऊन आम्हाला धन्यवाद देत होता.
मला अमेरिकन उच्चार नीट कळत नाहीत आणि तसे बोलताही येत नाही तरी मी निघताना त्यांना सांगितले
“यु आर ऑल्वेज वेलकम, यू ह्याव सोल्ड युअर हाऊस ऍज प्रॉपर्टी बट रिमेम्बर दॅट, वन्स अपॉन अ टाईम, इट वॉज युअर होम अँड होम कॅन नेव्हर बी सोल्ड, ऍज होम मीन्स फॅमिली, होम मीन्स इमोशन्स, कंफोर्ट, सेक्युरिटी अँड होम मीन्स लॉट ऑफ मेमोरीज” .

# 'अमेरिका' शब्दकोडे : उत्तरे

**आडवे शब्द** :-

१] टेनेसी ३] मिशिगन ६] नेवाडा ७] टॉम ८] क्लिंट ९] सदरलँड १२] केट १३] ज्यो (बायडन)१५] नसा (सान) १७] पीटर १९] जॅक २१] राइट २३] सेक्स २४] मेटा २६] बेल २७] टिना २८] लायन २९] जॉन ३०] न्यू ३१] मूनी ३२] क्ले ३४] डेनव्हर ३५] ली ३६] हार्पर

**उभे शब्द** :-

१] टेस्ला २] सिनेट ३] मिडास ४] गनर ५] जिम ७] टॉड ८] क्लिंटन १०] द ग्रेट ११] लँब्स १३] ज्यो (बायडन) १४] फ्रँक सिनात्रा १६] सारा १७] पीट १८] रसेल २०] पामेला २२] ईस्ट २५] टायसन २६] बेन २९] जॉनी ३०] न्यू ३१] मूर ३२] क्ले ३३] थॉर्प ३५] ली

# 'अमेरिका' - शब्दकोडे : उत्तरांसहित

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ टे | ने | २ सी | | ३ मि | शि | ४ ग | न | | ५ जि |
| स्ला | | ६ ने | वा | डा | | न | | ७ टॉ | म |
| | ८ क्लिं | ट | | ९ स | १० द | र | ११ लँ | ड | |
| १२ के | ट | | १३ ज्यो | | ग्रे | | ब्स | | १४ फ्रँ |
| | १५ न | १६ सा | | १७ पी | ट | १८ र | | १९ जॅ | क |
| २० पा | | २१ रा | २२ ई | ट | | २३ से | क्स | | सि |
| २४ मे | २५ टा | | स्ट | | २६ बे | ल | | २७ टी | ना |
| २८ ला | य | न | | २९ जॉ | न | | ३० न्यू | | त्रा |
| | स | | ३१ मू | नी | | ३२ क्ले | | ३३ थॉ | |
| ३४ डे | न | व्ह | र | | ३५ ली | | ३६ हा | र्प | र |

# धन्यवाद!!!


सेतू मराठी मनांचा
मराठी वारसा पुढे चालवा
Connect to Marathi Heritage
मराठी समुदायाचा प्रसार आणि सक्रिय पोहोच वाढवा
Expand Community Outreach
मराठी भाषा आणि साहित्याचे संगोपन करा
Nurture Marathi language and literature
विविध स्वारस्यांचा समुदाय विस्तृत करा
Build a Network of diverse interests
मराठी तरुणांना आणि युवा पिढी ला सक्षम करा
Empower Marathi Youth
मराठी संस्कृती वाढवा
Grow Marathi Culture
मराठी परंपरा जपा
Preserve Marathi Traditions